नियमीत दिवाणी दावा क्र. १७१/२०२१

शोभाबाई रिंगणमोडे व इतर ३

वि.

सोपान रिंगनमोडे व इतर ०६

**MHND**120003822021

<u>निशानी ३५ लगत आदेश</u>

०१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे वादपत्रात सुधारणा करण्याची परवानगी मिळावी यासाठी सादर केला आहे.

०२. अर्जाचे व प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी सादर केलेल्या कथनाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी या अर्जावर कथन सादर केले नाही.

०३. वादींचे सुविद्य विधीज्ञ श्री. रविंद्र खाडे यांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिवाणी दावा क्र. ४२/१९९३ मध्ये तडजोड करुन दावा मिळकत गट क्र. ७४ व गट क्र. ६८ मधील क्षेत्र प्रतिवादी क्र. २ च्या नावावर केले. तसेच, वादपत्रातील वंशवळीमध्ये आणि वादी क्र. २ च्या नावामध्ये 'बाबु' ऐवजी 'बाळु' अशी दुरुस्ती करावी. प्रस्तावित सुधारणा उभयपक्षकारातील खरेखुरे प्रश्न निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी असा त्यांनी युक्तीवाद केला.

०४. याउलट प्रतिवादी क्र. ६ व ७ चे सुविद्य विधीज्ञ श्री. शिवाजी कदम यांनी युक्तिवाद केला की, प्रस्ताविक सुधारणा ही केवळ दावा प्रलंबित करण्यासाठी दाखल केली आहे. प्रस्ताविक सुधारणा दाव्याचे स्वरुप बदलवणारी आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा असा त्यांनी युक्तीवाद केला.

**०५.** उपरोक्त युक्तीवादाच्या पार्श्वभुमिवर संचिकेचे अवलोकन केले असता खालील प्रश्न निश्चयाकरिता माझे समक्ष उपस्थित झाले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे त्यावरील कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नमुद करत आहे.

| **अ. क्र.** | **प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| ०१ | वादपत्रात सुधारणा करणे आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| ०२ | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**प्रश्न क्रमांक १ व २ साठी –**

**०६.** दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे अभिकथनामध्ये सुधारणा करण्यासाठी परवानगी देताना न्यायालयाने खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

**अ.** प्रस्तावित सुधारणा ही उभय पक्षकारांतील खरेखुरे वादग्रस्त प्रश्न निश्चीत करण्यासाठी आवश्यक असली पाहिजे.

**आ.** प्रस्तावित सुधारणा ही दाव्याचे स्वरुप बदलणारी नसली पाहिजे.

**इ.** प्रस्तावित सुधारणा ही विरुध्द बाजुवर अन्याय करणारी नसली पाहिजे.

**ई.** दाव्यामध्ये पुरावा सुरु झाला असला तर प्रस्तावित सुधारणा तत्पुर्वी का करण्यात आली नाही ? याचे स्पष्टीकरण वादीने दिले पाहिजे.

**०७.** कायदयाच्या उपरोक्त तत्वाच्या पार्श्वभूमीवर वादी सादर करत असलेली प्रस्तावित सुधारणा ही प्रतिवादीं वर अन्याय करणारी नाही. तसेच दिवाणी दावा क्र. ४२/१९९३ चा संदर्भ वादींनी वादपत्रात नमुद केला आहे. केवळ प्रस्ताविक सुधारणेद्वारे वादी त्याबाबत जाहीर ठराव मागत आहेत. प्रस्ताविक सुधारणा दाव्याचे स्वरुप बदलवणारी नाही. तसेच, प्रतिवादीं सुधारित लेखी कैफीयत देऊ शकतात आणि त्यांचा बचाव सुद्धा सादर करू शकतात. प्रस्तावित सुधारणा

दाव्याचे स्वरूप बदलवणारी नाही. प्रस्ताविक सुधारणा उभयपक्षकारांतील खरेखुरे प्रश्न न्यायनिर्णयीत करण्यासाठी आवश्यक आहे. दाव्यात अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे वादीला वादपत्रात सुधारणा करण्याची परवानगी देणे न्यायसंगत आहे. त्या अनुषंगाने मी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवुन प्रश्न क्रमांक २ च्या उत्तराच्या अनुषंगाने खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**०२.** वादींनी दिनांक ११/०२/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी वादपत्रात सुधारणा करुन सुधारीत वादपत्र सादर करावे.

**०३.** वादींनी या अर्जाचा खर्च रुपये ५००/– प्रतिवादी क्र. ६ व ७ यांना एकत्रीतपणे दयावा.

**(आदेशाचे खुल्या न्यायालयात लेखन व निवेदन करण्यात आले.)**

PATKI RAJESH RAMESHRAO

Digitally signed by PATKI RAJESH RAMESHRAO
Date: 2026.01.21 16:25:46 +0530

दिनांकः– २१/०१/२०२६.

**( राजेश रमेशराव पत्की )**

दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,

भोकर.